# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली.

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(आस्थापना व प्रशासन विभाग)**

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५

email:- gug.registrar@gmail.com दुरध्वनी क्र. ०७१३२-२२३१०४ email:-gondwanaesst@gmail.com

जा.क्र. गो.वि./आस्था./७३४१/२०२१ दि.२९ /०९/२०२१

## सुधारित अधिसुचना

संदर्भ :- अधिसुचना जा.क्र. गो.वि./आस्था./७२७०/२०२१, दि. २३/०९/२०२१.

गोंडवाना विद्यापीठाचा नववा दीक्षांत समारंभ कोव्हिड-१९ च्या पार्श्वभुमीवर केंद्र व राज्य शासनाच्या तसेच जिल्हा प्रशासनाच्या मार्गदर्शक सुचना व निर्देशांना अनुसरुन मंगळवार दि. १२ ऑक्टोंबर, २०२१ रोजी सकाळी ११.३० वाजता महाराजा हॉल सिटी हार्टजवळ धानोरा रोड, गडचिरोली येथे संपन्न होणार आहे. सदर दीक्षांत समारंभाला अध्यक्ष म्हणून विद्यापीठाचे कुलपती मा. श्री. भगत सिंह कोश्यारी महामहिम राज्यपाल, महाराष्ट्र राज्य हे लाभणार असून श्री. हर्ष चव्हान, मा. अध्यक्ष, राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोग, भारत सरकार हे मुख्य अतिथी असणार आहेत तसेच गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरु मा. प्रा. श्रीनिवास वरखेडी व प्र-कुलगुरु मा. डॉ. श्रीराम कावळे यांची विशेष उपस्थिती राहणार आहे.

आयोजित समारंभामध्ये मा. अध्यक्ष, अतिथी, अधिसभा, व्यवस्थापन परिषद, विद्यापरिषद व विद्यापीठाच्या विविध प्राधिकरणे/मंडळे व समित्यांचे सन्माननिय सदस्य यांच्या प्रमुख उपस्थितीत विशेष गुणवत्ता प्राप्त व प्रावीण्य प्राप्त विद्यार्थी व विद्यार्थीनींना सुवर्ण पदक व पदवी प्रदान करण्यात येणार आहे.

त्याअनुषंगाने विद्यापीठ परिक्षेत्रातील अधिकारी व कर्मचारी तसेच विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांचे अध्यक्ष, सचिव, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच विद्यार्थी व विद्यार्थीनी यांनी मंगळवार दि. १२ ऑक्टोंबर, २०२१ रोजी सकाळी ११.३० वाजता नवव्या दीक्षांत समारंभास उपस्थित राहावे तसेच तसेच कोव्हिड-१९ च्या पार्श्वभुमीवर केंद्र व राज्य शासन तसेच जिल्हा प्रशासन यांच्या मार्गदर्शक सुचना व निर्देशांचे सर्वांनी काटेकोरपणे पालन करावे, हि नम्र विनंती.

29.9.2021

**(डॉ. अनिल चिताडे)**
कुलसचिव(प्र.)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**प्रतिलिपी:-**

१. मा. कुलगुरु यांचे स्विय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. प्र-कुलगुरु यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
३. मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांनी सदर अधिसुचना कृपया, आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावे.
४. मा. सर्व शैक्षणिक तसेच प्रशासकीय विभाग प्रमुख/युनिट प्रमुख, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांनी सदरहू अधिसुचना कृपया, आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावे
५. सिस्टीम ॲनालिस्ट, संगणक विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना सुचित करण्यात येते की, सदर अधिसुचना विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.
६. आस्थापना व प्रशासन विभाग(नस्ती), गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

**(डॉ. विजय सिलारे)**
उपकुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

D:\PROGRAMME & WORKSHOP\9 CONVOCATION\Adhisuchana.Docx